# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः21.05.2025** **वारःबुधवार**

---

1. ऑपरेशन सिंदूरच्या पार्श्वभूमीवर भारताची बाजू मांडण्यासाठी 32 देशांत शिष्टमंडळे रवाना होण्यास सुरुवात
2. फळं पिकवण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या द्रव्यांच्या, कृत्रिम रंग आणि मेणाच्या वापरावर नियंत्रण ठेवण्यासाठी मोहीम
3. जागतिक कीर्तीचे खगोल शास्त्रज्ञ डॉक्टर जयंत विष्णू नारळीकर यांचं निधन. आज होणार अंत्यसंस्कार आणि
4. महाराष्ट्रातल्या बहुतांश भागात पुढील चार दिवस मुसळधार पावसाचा इशारा.

**<u>शिष्टमंडळ</u>**

ऑपरेशन सिंदूरवरील भारताच्या राजनैतिक संपर्कासाठी स्थापन केलेल्या सातपैकी पहिले सर्वपक्षीय शिष्टमंडळ आज चार देशांना रवाना होत आहे. शिवसेना खासदार श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळ युएई, लायबेरिया, डेमोक्रॅटिक रिपब्लिक ऑफ काँगो आणि सिएरा लिओनला रवाना होईल. गुरुवारी खासदार संजय झा यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळ इंडोनेशिया, मलेशिया, कोरिया प्रजासत्ताक, जपान आणि सिंगापूरला रवाना होईल तर द्रमुक खासदार कनिमोळी करुणानिधी यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळ स्पेन, ग्रीस, स्लोव्हेनिया, लाटविया आणि रशियाच्या दौऱ्यावर जाणार आहे. ही शिष्टमंडळे दहशतवादाविरुद्ध शून्य सहनशीलतेची भारताची भूमिका मांडतील. परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांनी काल नवी दिल्लीतील संसद भवनात शिष्टमंडळातील सदस्यांना माहिती दिली. सर्व शिष्टमंडळे पुढील महिन्याच्या 5 तारखेपर्यंत एकंदर 32 देशांना भेट देतील.

**<u>मोदी-मर्झ</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जर्मन चांसलर फ्रेडरिक मर्झ यांचं पदभार स्वीकारल्याबद्दल अभिनंदन केलं आहे. दोन्ही नेत्यांनी भारत आणि जर्मनीमधील धोरणात्मक भागीदारी आणखी मजबूत करण्याच्या तसंच दहशतवादाविरुद्धच्या लढाईत एकजूट राहण्याची वचनबद्धता व्यक्त करत प्रादेशिक आणि जागतिक घडामोडींवरही विचारांची देवाणघेवाण केली.

**<u>वक्फ</u>**

वक्फ सुधारणा कायदा 2025 ला अंतरिम आदेश देण्याच्या मुद्द्यावर आव्हान देणाऱ्या याचिकांवर काल सर्वोच्च न्यायालयाने सुनावणी केली. या कायद्याला स्थगिती देण्यासाठी ठोस मुद्दे मांडावे लागतील असं सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई आणि न्यायमूर्ती ए जी मसीह यांच्या खंडपीठाने म्हटलं आहे. न्यायमूर्ती भूषण गवई यांनी म्हटलं आहे की, न्यायालयांना संसदेने पारित केलेल्या कायद्यांमध्ये असंवैधानिकता दिसून येत नाही तोपर्यंत हस्तक्षेप करता येत नाही. खंडपीठ आज केंद्र सरकारची बाजू ऐकणार आहे.

**<u>गवई</u>**

सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांच्या महाराष्ट्राच्या दौऱ्यादरम्यान महाराष्ट्र सरकारकडून राजशिष्टाचार पाळला न गेल्याबद्दल राज्याचे मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिलगिरी व्यक्त केली आहे. यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस गवई यांच्याशी संवाद साधणार असल्याचं बावनकुळे यांनी म्हटलं आहे. दरम्यान झालेल्या प्रकाराबद्दल महाराष्ट्र आणि गोवा बार कौन्सिलने महाराष्ट्राचे मुख्य सचिव, पोलिस महासंचालक आणि मुंबई पोलिस आयुक्त यांचा निषेध केला आहे.

**FSSAI**

भारतातील अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाने सर्व राज्ये आणि केंद्र शासित प्रदेशांना, फळं पिकवण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या द्रव्यांच्या, कृत्रिम रंगांच्या वापरावर तसंच फळांवर मेणाचं आवरण करण्याच्या प्रक्रियेवर नियंत्रण ठेवण्यासाठी विशेष अंमलबजावणी मोहीम राबवण्याचं आवाहन केलं आहे. कॅल्शियम कार्बाइड आदींचा बेकायदेशीर वापर रोखण्यासाठी प्राधिकरणांनं सर्व राज्ये आणि संघ प्रदेशांच्या अन्न सुरक्षा आयुक्तांना आणि प्राधिकरणाच्या प्रादेशिक संचालकांना फळांच्या बाजारांवर कठोरपणे लक्ष ठेवण्याची तसंच मानक कार्यपद्धतींचं पालन करण्याची सूचना केली आहे.

**अटारी-वाघा**

भारत आणि पाकिस्तान यांच्या अटारी-वाघा संयुक्त तपासणी नाक्यांवरील बीटिंग रिट्रीट समारंभ आज संध्याकाळपासून सर्वसामान्यांसाठी खुला होणार आहे. भारताच्या 'ऑपरेशन सिंदूर'च्या पार्श्वभूमीवर 8 मे रोजी औपचारिक कवायत थांबवण्यात आली होती. आजपासून कवायती दरम्यान दरवाजे बंद राहणार असून दोन्ही देशांच्या सुरक्षा कर्मचा-यांमध्ये हस्तांदोलन तसंच कोणत्याही प्रसंगी मिठाई किंवा भेटवस्तूंची देवाणघेवाण होणार नाही.

**स्लॅब कोसळली-ठाणे**

कल्याणमध्ये काल एका रहिवासी इमारतीचा स्लॅब कोसळून झालेल्या दुर्घटनेत एका लहान मुलासह सहा जणांचा मृत्यू झाला, तर सहा जण जखमी झाले. मृतांच्या नातेवाईकांना पाच लाख रुपये अर्थसहाय्य देण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे.

**निधन**

जागतिक कीर्तीचे खगोल शास्त्रज्ञ डॉक्टर जयंत विष्णू नारळीकर यांचं काल महाराष्ट्रातील पुण्यात वृद्धापकाळानं निधन झालं. ते 86 वर्षांचे होते. विज्ञान आणि प्रामुख्यानं खगोलशास्त्र या विषयात डॉ. नारळीकर यांनी बहुमोल कार्य केलं. पुण्यातल्या आयुकाची स्थापना करून त्यांनी खगोलशास्त्र विषयातील संशोधनाला चालना दिली. भारत सरकारनं पद्मभूषण आणि पद्मविभूषण सन्मान देऊन त्यांचा गौरव केला. संशोधनाबरोबरच त्यांनी लेखनाच्या माध्यमातून विज्ञानवादाचा प्रसारही केला. वैज्ञानिक लेखांबरोबरच त्यांच्या विज्ञान कथाही खूप गाजल्या. अंतराळातील भस्मासुर, अंतराळ आणि विज्ञान, आकाशाशी जडले नाते, सूर्याचा प्रकोप ही त्यांची काही गाजलेली पुस्तकं. 94 व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचं अध्यक्षपदही डॉक्टर नारळीकर यांनी भूषवलं होतं. डॉक्टर नारळीकर यांच्याविषयीच्या आपल्या भावना व्यक्त करताना ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉक्टर रघुनाथ माशेलकर म्हणाले.....

**आज भारतीय विज्ञान विषयातील एक तेजस्वी तारा कायमचा नजरेआड झाला आहे असं मला वाटतं कारण ज्येष्ठ खगोलशास्त्रज्ञ विचारवंत विज्ञान प्रसारक डॉक्टर जयंत नारळीकर यांच्या निधनाने माझ्या मते तर एक युग संपला आहे आणि सर फ्रेड ऑयल यांच्याबरोबर मांडलेला ऑल नार्डीकर सिद्धांत हा केवळ गणिती कल्पनेचा पराकर्ष नव्हता तो ब्रह्मांडाच्या उत्पत्ती विषयाच्या विचारांना एक भारसी वैकल्पिक दिशा देणारा होता पण माझ्यामध्ये त्यांचं मोठं कार्य त्यांनी विज्ञान सामान्य माणसापर्यंत त्यांच्या हृदयापर्यंत पोहोचवून केलं त्यांच्या लेखनाने व्याख्यानाने दूरदर्शन मालिकांनी लाखो विद्यार्थी नागरिक विज्ञानाच्या प्रेमात पडले ते केवळ वैज्ञानिक नव्हते ते विज्ञानाचे तत्वज्ञ होते माझे ते घनिष्ठ मित्र होते बरं का जवळचा असा आमचा संबंध आहे पन्नास वर्षांपूर्वी मी परत आलो भारतामध्ये आणि त्यावेळी ताराताई भोले यांचा आशीर्वाद घेण्यासाठी मी त्यांच्या घरी गेलो होतो तर त्यांनी मला आशीर्वाद काय दिला माहिती आहे का मोठा हो जयंत नारळीकर हो म्हणजे त्यांच्या मते जयंत नारळीकर हे सर्वोत्कृष्ट सायंटिस्टचं मापदंड होतं आणि माझ्या मते ते तसंच राहील मला असं वाटतं की आज ते आपल्यात नाहीत पण त्यांचा कल्पनांचा जो प्रकाश आहे तो अजूनही आकाशगंगेच्या पल्ल्यावर झळकत राहील त्यांना कृतज्ञतेने प्रेमाने आणि अभिमानाने मी अंतिम परिणाम करतो.**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अन्य केंद्रिय मंत्र्यांनी नारळीकरांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे. नारळीकरांचं काम भविष्यातल्या अनेक पिढ्यांना प्रेरणा देत राहील असं राष्ट्रपतींनी आपल्या शोकसंदेशात म्हटलं आहे. युवा पिढीच्या संशोधक वृत्तीला प्रोत्साहन देऊन त्यांना प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांची उभारणी करण्यामध्ये नारळीकर यांचं मोलाचं योगदान आहे असं पंतप्रधानांनी म्हटलं आहे. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, आणि एकनाथ शिंदे यांनी नारळीकर यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केलं आहे. डॉ. जयंत नारळीकर यांच्या निधनामुळे भारतीय वैज्ञानिक क्षेत्राची मोठी हानी झाली आहे असं या सर्वांनी आपल्या शोकसंदेशात म्हटलं आहे. आज नारळीकर यांच्या पार्थिवावर पुण्यात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

**श्रीनिवासन निधन**

ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ आणि अणुउर्जा आयोगाचे माजी अध्यक्ष डॉक्टर एम. आर. श्रीनिवासन यांचं काल उटी इथं निधन झालं. ते 95 वर्षांचे होते. अणुउर्जा क्षेत्रातील त्यांच्या योगदानासाठी त्यांना पद्मविभूषण पुरस्कारानं गौरवण्यात आलं होतं. भारताची पहिली अणुभट्टी अप्सराच्या निर्मितीत डॉक्टर होमी भाभा यांच्यासोबत श्रीनिवासन यांचा सहभाग होता. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी डॉक्टर श्रीनिवासन यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे. भारताची उर्जा सुरक्षा आणि वैज्ञानिक विकास या क्षेत्रांमधलं श्रीनिवासन यांचं योगदान सदैव स्मरणात राहील असं त्यांनी समाज माध्यमावरील शोकसंदेशात म्हटलं आहे.

**क्रिकेट**

आयपीएल क्रिकेटमध्ये काल राजस्थान रॉयल्सने चेन्नई सुपर किंग्जचा सहा गडी राखून पराभव केला. 188 धावांचं लक्ष्य गाठताना राजस्थानने वैभव सूर्यवंशीच्या 33 चेंडूतील 57 धावांच्या जोरावर हे आव्हान सहज पार केलं. राजस्थान रॉयल्सच्या आकाश मधवालला सामनावीर म्हणून गौरवण्यात आलं. आज, मुंबई इंडियन्सचा सामना दिल्ली कॅपिटल्स संघाबरोबर होणार आहे.

**हवामान**

कोकण आणि मुंबईत पुढील चार दिवस वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाचा पिवळा बावटा तर रायगड, नाशिक आणि पुण्यासह महाराष्ट्रातल्या इतर भागांमध्ये जोरदार पावसासाठी केशरी बावटा हवामान विभागानं जारी केला आहे. मान्सूनच्या अनुकूल स्थितिमुळे वेळेपूर्वीच पावसाला सुरुवात झाली असून यंदा चांगला पाऊस होण्याचा अंदाज हवामान तज्ज्ञांनी वर्तवला आहे. महाराष्ट्राच्या विविध भागात गेल्या 15 दिवसांपासून बिगरमोसमी पाऊस होत आहे.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.